संजय श्रीपतराव काटकर, (भा.प्र.से.)
आयुक्त सो.,

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे मूळ अंदाज
# महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांचे अर्थसंकल्पाबाबत निवेदन

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ अन्वये सन २०२३-२४ चा सुधारित व सन २०२४-२५च्या मूळ अर्थसंकल्पासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर करताना मला आनंद होत आहे. आगामी वर्षाचे आर्थिक अंदाजपत्रक तयार करतांना समाजातील शेवटच्या माणसाच्या विकासाचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते, पाणी, वीज, उड्डाणपुल व अन्य पायाभूत सुविधांचा विकास तर करायचा आहेच, पण त्यासोबत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांनी पाहिलेले सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. आज मी सादर करीत असलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील एकेका पैशाचे नियोजन मिरा भाईंदरच्या स्वप्नपुर्तीसाठीच असेल असा मी विश्वास देत आहे.

सन २०२३-२४ मध्ये रु. २१७४ कोटी ५४ लक्ष रकमेचा अर्थसंकल्प तयार करण्यात आला होता. यामध्ये काही विभागांच्या उत्पन्नात घट येत असून महसुली उत्पन्न रु.९०२ कोटी ९६ लक्ष ऐवजी रु.७३८ कोटी ८० लक्ष असे सुधारित करण्यात येत आहे. महापालिकेस प्राप्त होणा-या अनुदानातील घट विचारात घेता मूळ अर्थसंकल्पात अपेक्षित केलेल्या अनुदानामध्ये घट होत असून सुधारित अर्थसंकल्पात शासन अनुदानापोटी रु.३४५ कोटी ४१ लक्ष अनुदान अपेक्षित केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सन २०२३-२४ च्या उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेऊन सुधारित रु. १७३४ कोटी १८ लक्ष चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे रु.२२९७ कोटी ९४ लक्ष चे मूळ अंदाजपत्रक सादर करीत आहे.

यापुढे सन २०२३-२४ च्या सुधारित व सन २०२४-२५ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर मी भाष्य करणार आहे.

(आकडे कोटीत)

| तपशिल | सन २०२३-२४ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२३-२४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२४-२५ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| महापालिका उत्पन्न | ११५९.१६ | ८८२.५९ | १०६५.९८ |
| अनुदाने | ५०८.४३ | ३४५.४१ | ६२९.०३ |
| कर्ज | ४३०.०० | २१३.२६ | ५४१.५८ |
| असाधारण | ७६.७५ | ६२.८७ | ६१.१५ |
| आरंभिची शिल्लक | ०.२० | २३०.०५ | ०.२० |
| **अर्थसंकल्पीय अंदाज** | **२१७४.५४** | **१७३४.१८** | **२२९७.९४** |

**सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक रु. २२९७.७१ कोटी खर्चाचे व रु. ०.२३ कोटी शिलकेचे असे एकुण रु.२२९७.९४ कोटीचे मूळ अंदाजपत्रक प्रस्तावित करण्यात येत आहे.**

## सन २०२४-२५ च्या मूळ अर्थसंकल्पातील प्रमुख उद्दिष्टे :

१. आरोग्य विभाग व शिक्षण विभागास प्राधान्य

२. महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर

३. खर्चामध्ये वित्तीय शिस्त

४. अनावश्यक महसुली खर्चात कपात

५. स्वच्छता, आरोग्य व शिक्षण या त्रिसुत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी

६. भांडवली कामांतर्गत हाती घेतलेली कामे पूर्ण करण्याचे नियोजन

७. प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा

८. प्राप्त अनुदानातील कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन

९. कामांचा दर्जा उत्तम रहावा याकडे विशेष लक्ष

१०. शासन अनुदानापोटी द्यावयाचा मनपा हिस्सा प्रस्तावित

११. अमृत २.० अंतर्गत पाणी पुरवठा व भुयारी गटार योजना टप्पा -२ योजना पुर्णत्वास नेण्याकडे कल

## महापालिका उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत :

### १) मालमत्ता कर :-

मालमत्ता करापासून सन २०२३-२४ मध्ये **रु.२४८ कोटी ६६ लक्ष** इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. परंतु आतापर्यंतचे प्रत्यक्ष उत्पन्न विचारात घेवून मालमत्ता करापासून **रु. २३२ कोटी ८२ लक्ष** सुधारित अंदाज करण्यात येत आहेत.

सन २०२४-२५ मध्ये मालमत्ता कर व फीसह **रु. २६० कोटी** १० **लक्ष** इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे.

### २)विकास व तत्सम शुल्क :-

सन २०२३-२४मध्ये शहर विकास विभागाकडून विकास व तत्सम शुल्कापोटी **रु. २०० कोटींचे** उत्पन्न अपेक्षित केले होते.

नविन नियमावलीनुसार काही शुल्काचे दर कमी झालेले असल्यामुळे व काही बाबी भुनिर्देशांकात समाविष्ट झाल्याने त्यापोटी मिळणारे अधिमुल्यात घट झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये नगररचना विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार नगररचना विभागाकडील उत्पन्न रु.११० कोटी सुधारित करण्यात आले आहे.

सन २०२४-२५या आर्थिक वर्षात **रु. १५० कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे.

### ३) वस्तु व सेवा कर अनुदान/स्थानिक संस्था कर:-

सन २०२३-२४ मध्ये वस्तू व सेवाकर अनुदानापोटी **रु. २८० कोटी**, मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान रु.५५कोटी, स्थानिक संस्था कराची मागील वसुली **रु.५ कोटी** असे एकूण **रु.३४० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते. शासनाकडून वस्तू व सेवाकर अनुदानाची रक्कम नियमितपणे प्राप्त होत असून आतापर्यंत प्रत्यक्षात प्राप्त झालेले उत्पन्न विचारात घेऊन वस्तू व सेवाकर अनुदानापोटी **२८० कोटी**, मुद्रांक शुल्कापोटी सुधारित अंदाज **रु.५५ कोटी**, तसेच स्थानिक संस्था कराच्या सुधारित अंदाज **रु.१० कोटी** करण्यात आले आहे.

तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वस्तू व सेवाकर अनुदानापोटी **रु.३०२ कोटी ४० लक्ष,** मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान **रु.५९ कोटी ४० लक्ष,** स्थानिक संस्था कराची मागील वसुली **रु.१० कोटी** उत्पन्न अपेक्षित आहे.

**४)पाणी पुरवठा आकार :-**

पाणी पुरवठा आकारासाठी सन २०२३-२४ मध्ये **रु.९० कोटी** उत्पन्न अपेक्षित होते. पाणी पुरवठा आकाराचे प्रत्यक्ष उत्पन्न विचारात घेता सुधारित अंदाज **रु.८५कोटी** अपेक्षित केले असून सन २०२४-२५ मध्ये पाणी पुरवठा आकारासाठी **रु.१०० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**५)अग्निशमन फी व आकार:-**

सन २०२३-२४ मध्ये अग्निशमन विभागाकडून मुळ अंदाज **रु.५६ कोटी २२ लक्ष** अपेक्षित केले होते. आतापर्यंत प्रत्यक्ष उत्पन्ना विचारात घेता **रु.४७ कोटीचे** सुधारित अंदाज प्रस्तावित केले आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी **रु. ६२ कोटी २७ लक्ष** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**६)स्थावर मालमत्ता विभाग :-**

सन २०२३-२४ या वर्षासाठी **रु. १७ कोटी ६ लक्ष** इतके उत्पन्न अपेक्षित केले होते परंतु प्रत्यक्षात प्राप्त रकमा विचारात घेता त्या सुधारित करुन **रु.५ कोटी ७४ लक्ष** अपेक्षित केलेल्या आहेत.

सन २०२४-२५ मध्ये स्थावर मालमत्ता विभागाकडून **रु.५ कोटी ८३ लक्ष** उत्पन्न अपेक्षित आहे.

**७)जाहिरात फी :-**

जाहिरात फी पोटी सन २०२३-२४ मध्ये **रु.९ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते. प्रत्यक्ष उत्पन्न विचारात घेता **रु.८ कोटी** अपेक्षित केले असून सन २०२४-२५ मध्ये **रु.९ कोटी ४० लक्ष** उत्पन्न अंदाजित केले आहे.

**८) रस्ते खुदाई फी:**

रस्ते खुदाई फीव्दारे सन २०२३-२४ मध्ये **रु. ११० कोटी** अपेक्षित केले होते परंतु प्रत्यक्ष प्राप्त रकमांचा विचार करता **रु. ५० कोटी** सुधारित अंदाज अपेक्षित केले आहे.

सन २०२४-२५ मध्ये रस्ते खुदाई फी व्दारे **रु. ६० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**९) अनुदाने:-**

शासनाकडून आतापर्यंत **रु.१३६ कोटी ३२ लक्ष** अनुदान प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने १५ व्या वित्त आयोगाकडून **रु.२४ कोटी २७ लक्ष**, अमृत २.० योजनेतंर्गत **९६ कोटी ८८ लक्ष**, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक भवन याकामी **रु. ४ कोटी ८ लक्ष**, माझी वसुंधरा अभियानातंर्गत **१ कोटी** व इतर अनुदाने **१० कोटी ९ लक्ष** ही अनुदाने प्राप्त झाल्याने अंदाजपत्रकात **रु.३४५ कोटी ४१ लक्ष** सुधारित उत्पन्न अपेक्षित केले आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी **रु.६२९ कोटी ३ लक्ष** अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहेत.

**१०) कर्ज:**

सन २०२३-२४ मध्ये **रु.४३० कोटी** कर्ज घेणे अपेक्षित होते. तसेच सुधारित अंदाजपत्रकामध्ये **रु. २१३ कोटी २६ लक्ष** इतकी तरतूद करण्यात येत आहे.

सन २०२४-२५ या वर्षासाठी **रु. ५४१ कोटी ५८ लक्ष** कर्ज उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अशा प्रकारे सन २०२३-२४ मध्ये आरंभिच्या शिल्लकेसह सुधारित अंदाजपत्रक रु.१७३४ कोटी १८ लक्ष व सन २०२४-२५मध्ये आरंभिची शिल्लकेसह मूळ अंदाज रु.२२९७ कोटी ९४ लक्ष जमा बाजूस अपेक्षित केले आहे.**

# खर्च बाजू

## बांधकाम/विद्युत विभाग

### ❖ सन २०२४-२५ या वर्षाकरीता करावयाची उल्लेखनीय कामे

**(१) सिमेंट कॉँक्रीट रस्ते तयार करणे**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्र ७९.४० चौ.कि.मीटर एवढे असुन शहराची लोकसंख्या सुमारे १४ लक्ष एवढी आहे. शहर मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने शहराचे नागरीकरण वेगाने होऊन लोकसंख्या देखिल वेगाने वाढत आहे. शहराचा विकास वेगाने होत असल्याने वाहतुक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी विकास योजनेतील रस्ते तयार करणे, रस्त्याचे रुंदीकरण, प्रमुख रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत.

महानगरपालिका हद्दीतील प्रमुख रस्त्यावर भुयारी गटाराची कामे पूर्ण झाल्याने महानगरपालिकेने टप्प्या-टप्प्याने सिमेंट कॉँक्रीट रस्त्याची कामे हाती घेतलेली आहेत. पहिल्या टप्प्यात २९ ठिकाणी सिमेंट कॉँक्रीट रस्ते त्याचप्रमाणे ९ ठिकाणी UTWT अंतर्गत रस्ते तयार करण्यात आलेली आहेत. एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून एकूण रु.३८७ कोटी रक्कमेची ४७ ठिकाणी (२१.८० कि.मी.) सिमेंट कॉँक्रीट रस्ते तयार करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मनपामार्फत ३७ ठिकाणी सिमेंट कॉँक्रीटचे रस्ते (२३.७९ कि.मी.) तयार करण्याचे कामे हाती घेतलेली आहेत. त्यासाठी सन २०२३-२४ च्या सुधारित अर्थसंकल्पात रु. ११० कोटी व सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. १५० कोटी एवढी तरतुद केलेली आहे.

**(२)हिंदु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कलादालन उभारणे.**

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी एक भव्य कलादालन बांधण्याचे काम सुरु आहे. कलादालन बांधकामासोबत सायन्स सेंटर, वाचनालय, एक्झीबिशन हॉल, ॲम्पी थिएटर, वरीष्ठ नागरिक विरंगुळा, चिल्ड्रन गेम्स, पेन्टींग हॉल, लॉबी, कॅफेटेरीया इ. कामाचा समावेश आहे. सदरील काम प्रगतीपथावर आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालनातील कंम्पाऊंड वॉल, स्वागत कक्ष / ॲडमीन ऑफीस, कॅफे, Grand staircase, Exhibition Room (३), Auditorium (१७५ person), Hologram Room, Studio, Suite Room – १,

Memorial display, Book & Audio Library इ. कामाकरीता सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. २ कोटी ५० लक्ष एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(३) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.३०० येथे स्व. प्रमोद महाजन यांचे कलादालन उभारणे.**

मा. प्रमोद महाजन यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी कलादालन बांधण्याचे काम सुरु आहे. सदरील कलादालनात एक्झीबिशन गॅलरी, कॅफे, लोटस पॉन्ड, स्टेपड् सिटींग, स्टुडिओ, सभागृह, वाचनालय इ. कामांचा अंतर्भाव असून सदरील काम अंतिम टप्प्यात आहे. सदरील काम पुर्ण करण्याकरीता सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. ३ कोटी ७५ लक्ष एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(४) घोडबंदर प्रवेशद्वारा समोर छत्रपती शिवाजी महाराजांचा ३० फुटी उंच अश्वारुढ पुतळा उभारणे**

रा.म.क्र.०८ घोडबंदर प्रवेशव्दारा समोरील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रस्तावित अश्वारुढ ३० फुट उंच धातुच्या पुतळ्या उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात असून सभोवतालच्या जागेत आर.सी.सी.कुंपण भिंत बांधुन, रॅलिंग बसवुन वाहतुक चौक बांधणे, तसेच सदर जागेत फुल झाडे, शोभिवंत लाईट्स लावुन वाहतुक चौक परिसराचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.२ कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(५) घोडबंदर किल्ला संवर्धन, नुतनीकरण करणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर येथे किल्ला असून सदर किल्ला पुरातत्व व वस्तु संग्रहालये, महाराष्ट्र राज्य यांच्या ताब्यात आहे. घोडबंदर किल्ला हा "राज्यशासनाकडून राज्य संरक्षित स्मारक" म्हणुन घोषित असून "राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजने" अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सदर किल्ला व त्याचा परिसर विकसीत करण्यासाठी पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस देण्यात आलेला आहे. सदर कामामध्ये विद्यमान स्टोरेज ग्रेनरील सिमेंट प्लास्टर करणे, स्टोरेज ग्रेनरीज ग्राऊटींग, चुना प्लास्टर करणे, स्टोरेज ग्रेनरीज भिंत मजबुत करणे, प्रवेश व्दारापासुन बागेच्या बाजुला दगडी फरसबंदी पुर्ण करणे, खुल्या मैदानाचे काम, इलेक्ट्रीक वायरिंग इ. कामे करण्यात आलेली आहेत. सदर कामामध्ये मध्यवती अंगणाचे लँडस्केप, बेसाल्ट पायऱ्या, बुरुजाच्या भिंतीची दुरुस्ती, बुरुजावर फरसबंद पायऱ्या, किल्ल्यावरील बुरुजावर लाकडी तोफ स्टँडची व्यवस्था तयार करणे, स्वयंचलित स्प्रिंकलर प्रणाली व प्लंबिंग कामे, बेंच बसविणे

इ.कामाचा समावेश आहे. सदरील कामे पुर्ण करण्याकरीता सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. १० कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(६) घोडबंदर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधणे.**

मौजे. घोडबंदर सर्व्हे क्र.२३३ या शासकीय जागेवर राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागामार्फत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधण्याचे काम मंजुर करण्यात आले असून सदरील इमारतीत विपश्यना सभागृह, मंगल कार्यालय, प्रदर्शन सभागृह, मिनी थिएटर, वाचनालय, कॉन्फरन्स हॉल, इ. सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. सदर इमारतीच्या कामास सुरुवात करण्यात आली असून सदरील काम प्रगतीपथावर आहे. सदरील कामे पुर्ण करण्याकरीता सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अनुदान व मनपा हिस्सा मिळून रु.०७ कोटी ५० लक्ष एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(७) विद्युत शवदाहिनी, गॅस शवदाहिनी:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत स्मशानभुमीमध्ये विद्युत शवदाहिन्या, गॅस शवदाहिन्या उभारल्या आहेत. सदर विद्युत शवदाहिन्या, गॅस शवदाहिन्यामुळे लाकडाचा वापर कमी होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही व पर्यावरण समतोल राखण्याच्या दृष्टीने पाऊले उचलण्यात येत आहेत. सदर स्मशानभुमीमध्ये विद्युत शव दाहिन्या / गॅस शवदाहिन्या, फरनेन्स, सोलर सिस्टीम, स्मोक कन्ट्रोल सिस्टीम, कुंपण भिंत, गोडावुन, लॅण्डस्केप, शौचालय, विद्युत विषयक कामे, बैठक व्यवस्था, थ्रीडी पेटींग, वॉल मुरल इ. कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी सन २०२४-२५या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.२ कोटी ७५ लक्ष एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(८) घोडबंदर येथे मल्टीपरपज (अग्निशमन केंद्र) इमारत बांधणे.**

सदर इमारतीमध्ये तळ मजल्यावर स्टोअर रुम, किचन, शौचालय इ. समावेश आहे. तसेच पहिल्या मजल्यावरती ऑफीस, २ कॅबिन, शौचालय इ. समावेश आहे. यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.३ कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## (९) मुलभूत सोयी सुविधा अंतर्गत करावयाची प्रमुख विकास कामे

### (I) तरण तलाव व आवश्यक सुविधेची इमारत बांधणे

भाईंदर पूर्व आरक्षण क्र. ९५, मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.२३०, मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २४२, आरक्षण क्र.३६८ या जागेत ऑलम्पिक साईज तरण तलाव व आवश्यक सुविधेची इमारत बांधण्याची कामे करण्यात येणार आहेत.

### (II) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर फुटपाथवर शोभिवंत रेलींग बसविणे.

मुंबई महानगपालिकेच्या धर्तीवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या फुटपाथवर शोभिवंत रेलिंग बसविण्यात येणार आहे. सदर रेलिंगसाठी GFRC (Glass Fiber Reinforced Composite) मटेरीयल वापरण्यात येणार आहे.

### (III) आरक्षण क्र.२४८ बगीचा या आरक्षित जागेत आवश्यक वापराची इमारत बांधणे (सद् गुरु सदानंद महाराज सभागृह).

सदरची इमारत तळ मजल्याची आहे. सदर इमारतीच्या कामांतर्गत २५०.०० चौ.मी. एवढ्या क्षेत्राचे हॉल बांधण्यात येणार असून तळमजल्यावर कार्यालय, वाचनालय, महिला व पुरुष यांच्याकरीता स्वतंत्र शौचालयांची व स्टोर रुमची व्यवस्था आहे. सदरील इमारतीच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

### (IV) आरक्षण क्र.२४८ बगीचा या जागेत आवश्यक वापराची इमारत बांधणे (कै.हरिश्चंद्र आमगांवकर जिमनॅस्टीक सेंटर).

सदरची इमारतीमध्ये हॉल बांधण्यात येणार आहे. तसेच व्यायामशाळा, महिला व पुरुष यांच्याकरीता स्वतंत्र चेंजींग रुम व शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

### (V) विहिरींचे शास्त्रोक्त पद्धतीने साफ-सफाई करुन नैसर्गिक व पिण्यायोग्य पाणी निर्माण करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विहीरीचे गाळ काढुन साफसफाई करुन घाण पाण्याच्या उपसा, करुन Jet Machine वापरुन मदतीने नैसर्गिक स्त्रोत्र मोकळे करणे, विहीरीचे दुरुस्ती / नव्याने बांधकाम करणे, सदर विहीरींवर रुम बांधणे, साठवणुक टाकी बांधणे, RO Plant बसविणे, सोलार सिस्टीम बसविणे इ. कामांचा समावेश आहे.

**(VI) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील डोंगराळ भागामध्ये व आदिवासी पाड्यांकरीता सोलर दिवे बसविणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आदिवासी पाडे व डोंगराळ भागात मुख्य विद्युत स्त्रोत्र पोहचला नसल्याने सदर परिसरातील नागरीकांना रात्रीच्या वेळी त्रास होत असतो. सदर ठिकाणी सोलर दिवे बसविल्यामुळे त्याचा निश्चितच फायदा सदर नागरीकांना होऊन वन्य जिवांपासून त्यांचे संरक्षण देखील होणार आहे. सदर कामांतर्गत आदिवासी पाडे व डोंगराळ भागाचा समाविष्ठ करण्यात आलेला आहे. सदर परिसरात ७१५ सोलार दिवे बसविण्यात येणार आहेत.

**(VII) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२५५ या जागेवर चिल्ड्रेन्स ट्राफिक पार्क बांधणे.**

शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियमांची माहिती होण्यासाठी रस्ते, सायकल ट्रॅक तयार करण्यात येणार असुन हॉस्पीटल इमारत, शाळा इमारत, पेट्रोल पंम्पचे प्रतीकृती तयार करण्यात येणार आहे. वाहतुक नियमांचे विविध माहिती दर्शक फलक (Signage's) बसविण्यात येणार आहे. तसेच लहान मुलांसाठी Play Area, Traffic board game इ.करण्यात येणार आहे. तसेच सिक्युरिटी केबीन, स्टाफ रुम, ए.व्हि.रुम इ. व्यवस्था करण्यात येणार आहे.

**(VIII) फुटबॉल टर्फ उभारणे.**

आरक्षण क्र.३००, आरक्षण क्र.२४६, आनंद दिघे मैदान, नवघर, सचिन तेंडुलकर मैदान याठिकाणी फुटबॉल टर्फ तयार करण्यात येणार आहेत.

**(IX) तलावात म्युझिकल फाऊंटन बसवुन सुशोभिकरण करणे.**

तलावांत ३० ते ४० फुट उंचीचे अद्यावत म्युझीकल फाऊंटन, त्यासाठी लागणारी ऑडीओ सिस्टीम, फिल्टरेशन प्लांट, पंम्प इ. तसेच उद्यानामध्ये बैठक व्यवस्था, ओपन जीम, शौचालय, लॅण्ड स्केपींग इ.व्यवस्था करण्यात येणार आहे.

**(X) आरक्षण क्र.२४६ येथे भारतरत्न स्व.लता दिनानाथ मंगेशकर संगीत विद्यालय (गुरुकूल) उभारणे.**

सदर इमारतीत म्युझिकल लायब्ररी, म्युझिकल क्लास रुम, म्युझिकल प्रॅक्टीस / डबींग रुम, लॅण्ड स्केपिंग, मुख्य प्रवेशव्दार, स्टील्ट पार्कींग, म्युरल, उद्वाहक, विद्युत व्यवस्था, महिला व पुरुष यांच्याकरीता स्वतंत्र शौचालयांची व्यवस्था, सुरक्षा केबीन, कुंपण भिंत इ. कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

**(XI) फाऊंटन हॉटेल समोरील मेरी टाईम बोर्डाच्या जागेमध्ये प्रवासी जेट्टी जवळ चौपाटी विकसीत करणे.**

सदर कामाअंतर्गत कुंपण भिंत, रस्ता, अद्यावत पार्कींग, Landscaping, तळ + १ जेटी स्टेशन, ओपन जीम, बायो शौचालय इ. कामांचा अंर्तभाव आहे.

**(XII) संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी भवन बांधणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा येथे नागरी सुविधा क्षेत्र भुखंडावर राज्य शासनाच्या महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकास या योजनेतुन वारकरी भवन इमारत बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**(१०) घोडबंदर येथील नियोजित महानगरपालिका प्रशासकीय भवन बांधणे.**

घोडबंदर येथे नागरी सुविधा क्षेत्र भुखंडावर विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात महानगरपालिका प्रशासकीय भवन इमारत बांधणेचे काम मंजुर करण्यात आले आहे. सदरील कामाचा भुमीपुजन समारंभ पार पडला असून कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

**(११) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.३०२ येथील हॉस्पीटल इमारत बांधणे.**

मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.३०२ हॉस्पीटलसाठी राखीव असुन सदर आरक्षणात समावेशक आरक्षणाच्या तरतुदीमधुन विकासकामार्फत विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात हॉस्पीटल इमारत बांधण्याचे काम करण्यात येणार आहे. सदर हॉस्पीटल इमारतीचे भुमीपुजन समारंभ पार पडला असून कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

**(१२) नरवीर तानाजी मालुसरे मराठा भवन बांधणे.**

महाजनवाडी, दहीसर चेक नाका येथे विकास हक्क प्रमाणपत्राच्या माध्यमातुन नरवीर तानाजी मालुसरे मराठा भवन इमारत बांधणेचे मंजुर करण्यात आलेले असुन सदर इमारत तळ अधिक १६ मजल्याची आहे. सदर इमारतीत सभागृह, २०० विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह व त्याअनुषंगिक सर्व व्यवस्था करण्यात येणार आहेत. सदर इमारतीच्या कामास सुरुवात करण्यात आली असून सन २०२४-२५ या वर्षात काम पूर्ण होणार आहे.

**(१३) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. २१०, २११ या जागेत कॅन्सर हॉस्पिटल इमारत बांधणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. २१०, २११ या जागेत अद्यावत सर्व सोई सुविधांनी युक्त कॅन्सर हॉस्पिटल बांधण्याचे काम प्रस्तावित असून राज्य शासनाकडुन परवानगी प्राप्त झाल्यानंतर सदरील हॉस्पिटलचे बांधकाम हाती घेण्यात येणार आहे.

**(१४) भाईंदर पश्चिम येथे महावीर भवन बांधणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे भाईंदर येथील स.क्र.५७९ (जुना), २४५ (नविन) हिस्सा क्र.७,८ व स.क्र.५८० (जुना), २२२ (नविन) हिस्सा क्र.६ या जागेतील नागरी सुविधा क्षेत्र (Amenity Open Space) मधील महावीर भवन इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर इमारतीत सभागृह, राहण्यासाठी रुम, व्यायामशाळा, किचन, पार्किंग, टेरेसवर स्विमिंगपूल इ. व्यवस्था करण्यात येणार आहे. सदरील महावीर भवन इमारत ही नागरी सुविधा क्षेत्र भूखंडावर विकासहक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली प्रमुख विकास कामे :

१. भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह इमारत

२. महापुरुषांचे पुतळे

३. धम्म सम्राट अशोक बुध्द विहार व विपश्यना मेडीटेशन सेंटर

४. लोढा ॲमिनिटी स्केटींग रिंग व तरण तलाव

५. काशिमिरा उड्डाणपुलाखाली सुशोभिकरण

६. भाईंदर (प.) स्टेशनलगतच्या परिसराचे सुशोभिकरण

७. साहित्यरत्न लोक शाहीर अण्णा भाऊ साठे इमारत

८. आरक्षण क्र.३५६ उर्दु शाळा इमारत

९. इंद्रलोक आरक्षण क्र.११५ मधील शाळा इमारत

१०. EV चार्जिग स्टेशन

११. आरक्षण क्र. २४१ कम्युनिटी सेंटर

१२. भाईंदर (पुर्व) स्टेशन लगतच्या परिसराचे सुशोभिकरण.

- ❖ बांधकाम विभागाकरिता सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात महसुली व भांडवली रु. ७२२ कोटी व कर्ज अनुदान रु.१५० कोटी असे एकूण रु. ८७२ कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

## नगररचना विभाग

महानगरपालिकेतील DP रोड ची कामे व अमृत २ अंतर्गत सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कामे पुर्ण करण्यासाठी जमीन ताब्यात घेण्यासाठी सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात भरीव तरतूद

- सन २०२३-२०२४ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. २५ कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.
- सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ५१ कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

## पाणीपुरवठा व मलनि:सारण विभाग

**सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जल वाहिन्या व वितरण व्यवस्था:**

- या कामासाठी रु. ५१६.७८ कोटीच्या योजनेस अमृत २ अंतर्गत मान्यता मिळालेली असुन सद्यस्थितीत सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.
- सदर योजनेमुळे सन २०५४ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणार असून शासनाने सुर्या धरण प्रकल्पातून मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी २१८ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मंजूर केलेले आहे.
- या योजनेमध्ये २३ उंच पाणी साठवण टाक्या, १भुस्तरीत साठवण टाकी, १ प्युअर वॉटर संप असून ४१ किमी लांबीची फीडरमेन/ट्रान्समिशन मेन पाईपलाईन आहे. तसेच १७६ किमी वितरण व्यवस्थेच्या पाईपलाईनचा समावेश आहे.
- सदरचे काम ७०% शासन अनुदान व ३०% मनपा हिस्सा मधून करण्यात येणार असून मनपा हिस्स्याची रक्कम १५ वा वित्त आयोग निधी व विकास आकार यामधून करण्यात येणार आहे.
- सन २०२३-२०२४ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ९० कोटी ४३ लक्ष शासन अनुदान व मनपा हिस्सा रु.३६ कोटी ७७ लक्ष असे एकूण रु. १२७ कोटी २० लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

- सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. १३५ कोटी शासन अनुदान व मनपा हिस्सा रु.८२ कोटी ५० लक्ष असे एकूण रु.२१७ कोटी ५० लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

**भुयारी गटार योजना टप्पा -२ (भाग-१):**

- या कामासाठी केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत रु. १७५.१९ कोटीच्या योजनेस मान्यता दिलेली आहे.
- भविष्यात सुर्या धरणातून उपलब्ध होणा-या २१८ द.ल.लि. पाण्यापासुन निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अस्तित्वातील भुयारी गटार योजनेचे विस्तारीकरण टप्याटप्याने करणे आवश्यक आहे. त्यासाठी एकुण ४८ द.ल.लि. क्षमतेची ४ मल: निसारण केंद्र उभारणे व अनुषंगीक कामाचा समावेश आहे.
- सन २०२३-२०२४ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ३० कोटी ६५ लक्ष शासन अनुदान व मनपा हिस्सा रु.२४ कोटी ८३ लक्ष असे एकूण रु. ५५ कोटी ४८ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.
- सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ४९ कोटी शासन अनुदान व मनपा हिस्सा रु.३९ कोटी २० लक्ष असे एकूण रु.८८ कोटी २० लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.
- सदर विभागाकरिता सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात महसुली व भांडवली रु. ४१७ कोटी ४८ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

### दैनंदिन साफसफाई:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण २४ वॉर्ड असून त्यामुळे सार्वजनिक/ व्यवसायीक क्षेत्रामध्ये दोन वेळेस झाडलोट, रस्त्यावर पडलेले डेब्रीज, माती, बेवारस फर्निचर, रस्ते दुभाजक पडलेले माती काढून उचलून घेणेची कामे खाजगीकरणामार्फत करण्यात येत आहे.मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन रस्ते, पदपथ, सार्वजनिक परिसर व रात्रीच्या वेळी व्यापारी क्षेत्र व बाजार परिसर साफ-सफाई, महिन्यातून दोन वेळा गटार सफाई करणे कामी एकुण १८०५ कंत्राटी कामगार आणि मनपा. मालकीच्या व ठेकेदाराच्या १४ CuMt Refuse Compactor, ५/८ CuMt Garbabe Tipper व ३.३ CuMt तीन कंपार्टमेंट एकुण १५७ वाहनाद्वारे दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करून घनकचराप्रकल्प ठिकाणी वाहतुक करण्यात येत आहे. त्यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१७० कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

शासन परिपत्रकानुसार महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणारा घनकचऱ्याचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण (at source waste segregation) करणेसाठी "घनकचरा विलगीकरण मोहिम" राबविण्यात येत आहे. टाकाऊ पासुन टिकाऊ वस्तु/कलाकृती करण्यात येत आहेत.

### नाले सफाई:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण क्षेत्रफळ ७९ चौ.कि.मी इतके आहे.शहरातील कच्चे/ पक्के नाले सफाईची कामे पावसाळ्यापुर्वी मुदतीत पुर्ण करण्यात आली आहे.त्यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. ३ कोटी ६७ लक्ष एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### स्वच्छ भारत अभियान:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वच्छ भारत अभियान अतंर्गत "स्वच्छ सर्वेक्षण" मध्ये भाग घेतला असून मिरा भाईंदर महानगरपालिकेचा खालीलप्रमाणे क्रमांक आला आहे.

| Swachh Survekshan (SS) | National Level Rank | State Level Rank |
|---|---|---|
| SS २०१९ | २७ | ०३ |
| SS २०२० | १९ | ०४ |
| SS २०२१ | ३१ | ०९ |
| SS २०२२ | ०७ | ०१ |
| SS २०२३ | ०७ | ०१ |

मिरा भाईंदर महानगरपालिकेस "कचरा मुक्त शहर" म्हणून गौरविण्यात आले असून मिरा भाईंदर शहर Water+ / ODF++ घोषित करण्यात आले आहे. याकरीता खालीलप्रमाणे मानांकन देण्यात आले आहे.

| Swachh Survekshan (SS) | Garbage Free City | ODF |
|---|---|---|
| SS २०१९ | ३ Star | ODF+ |
| SS २०२० | ३ Star | ODF++ |
| SS २०२१ | १ Star | ODF++ |
| SS २०२२ | ३ Star | ODF++ |
| SS २०२३ | ३ Star | Water+ |

Rally of Youth for Garbage Free Beaches, Hillls, and Tourist Places कल्पना म्हणून "Indian Swachhata League" स्वच्छता रॅली मध्ये देशात ०३ लाख ते १० लाख मध्ये प्रथम क्रमांक मिळाला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये देश पातळीवर ०१ ते १० लोकसंख्येचे श्रेणीमध्ये Best City in Citizen Feedback यामध्ये देशपातळीवर ०३ क्रमांक व महाराष्ट्र राज्यात ०१ क्रमांक प्राप्त झाला आहे.

## <u>घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभाग</u>

**शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार केंद्र शासन, राज्य शासन व मनपा हिस्सा निधीमधुन २०२४-२०२५ मध्ये खालील कामे हाती घेण्यात येत आहेत.**

A) क्षेपणभूमी येथे जमा असलेल्या जून्या घनकच-यावर Bio-Mining प्रक्रिया करणे, (Bio-Mining waste)यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात शासन व मनपा निधी असे एकूण रु.२५ कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

B) मौजे उत्तन येथे लिचेटवर प्रक्रिया करणे (LTP) यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात शासन व मनपा निधी असे एकूण रु.१ कोटी ८० लक्ष एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

C) बायोमिथेनायझेशन प्रकल्प उभारणे (Bio-Gas) यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.५ कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

D) सॅनिटरी लैण्डफिल्ड साईट तयार करणे (Sanitary Landfill) यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात शासन व मनपा निधी असे एकूण रु.०६ कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

E) मोजे उत्तन येथील शिल्लक इनर्ट व मिक्स घनकचरा हवारी करणे यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.३ कोटी एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

F) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे याकामी रु. १३ कोटी ची तरतूद करण्यात आलेली आहे.

I) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयीसुविधांच्या विकासाच्या योजनेबाबत महागरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने मुलभूत सोयी सुविधा विकस या योजने अंतर्गत शासन निर्णय क्रमांक-मनपा-2020/प्र.क्र.149/न.वि. 16 दिनांक 17 जून 2022 शहरांत विकेंद्रीकरण पद्धतीने 100 MT ओल्या कच-यापासून खत प्रकल्प उभारणे कामास मंजुरी दिलेली आहे. यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात शासन रु.१५ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

J) "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान" अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना 2023-24 करीता PLASMA TECHNOLOGY वर आधारीत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे,यासाठी सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात शासन अनुदान रु.५ कोटीएवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान - २**

- केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान २ अंतर्गत तलाव पुर्नजिवित करणेकामी मिरा भाईंदर शहरामध्ये २ तलावांचे पुर्नजिवित करणेकामी ३.५८ कोटीच्या प्रस्तावास नगरविकास विभागाने मान्यता दिलेली असुन सदरील योजने अंतर्गत शहरात एकूण २ तलावांचे पुर्नजिवित करण्यात येणार आहे.

  १. नवघर जुना तलाव

  २. सातकरी तुळशी तलाव

- **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील तलावांची नावे**

| अ.क्र. | तलावाचे नाव |
|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन तलाव |
| २ | मिरारोड (पूर्व) सुकाळ तलाव |
| ३ | भाईंदर (प.) राई येथील गांधी तलाव |
| ४ | भाईंदर (प.) उत्तन येथील मोह तलाव |
| ५ | भाईंदर (प.) राई राम मंदिर तलाव |
| ६ | भाईंदर (प.) मोर्वा सुर्य मंदिर तलाव |
| ७ | भाईंदर (पूर्व) खारीगांव मराठी शाळेजवळील खारीगांव तलाव |

| | |
|---|---|
| ८ | भाईंदर (प.) राव तलाव |
| ९ | मिरारोड (पूर्व) जरीमरी तलाव |
| १० | भाईंदर (प.) मोर्वा येथील गजानन सोन्या पाटील तलाव |
| ११ | भाईंदर (पूर्व) गोडदेव तलाव |
| १२ | भाईंदर (प.) उत्तन देव तलाव, पोसा हॉस्पिटल |
| १३ | भाईंदर (प.) नगरभवन मांडली तलाव |
| १४ | भाईंदर (पूर्व) नवघर येथील एस.एन. कॉलेज समोरील तलाव |
| १५ | भाईंदर (प.) मुर्धागांव येथील गावदेवी तलाव, (बालोद्यान तलाव) |
| १६ | भाईंदर (प.) मुर्धागांव येथील राम मंदिर तलाव |
| १७ | भाईंदर (प.) उत्तन शिरेरोड येथील पातली तलाव |
| १८ | मिरागांव येथील सातकरी तलाव |
| १९ | नाला तलाव उत्तन मिरारोड |
| २० | भाईंदर (पूर्व) अनंत नगर, दत्तम मंदिर रोड येथील नवघर तलाव |
| २१ | भाईंदर (प.) उत्तन रोड केशवसृष्टी जवळील नावाली तलाव |

## क्लस्टर योजना:

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुर्नविकासाकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेने एकूण २४ नागरी पुनरुत्थान आराखडे (एकुण क्षेत्र हेक्टर) तयार करुन प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यांत आलेली आहे.अधिसुचित केले आहेत. प्रशासनामार्फत प्रथम टप्यात २४ नागरी पुनरुत्थान आराखडयांपैकी ७ युआरपी प्रथम टप्यात अंमलबजावणी करणेकरीता निश्चित केलेले आहेत.

त्यापैकी यु.आर.पी. क्र. १ डाचकुलपाडा, यु.आर.पी. क्र.२माशाचापाडा, यु.आर.पी. क्र.३ मांडवीपाडा, यु.आर.पी. क्र. महाजनवाडी, यु.आर.पी.क्र. ५- पेणकरपाडा, यु. आर. पी. क्र. ६६० फुट रोड भाईंदर (प), यु. आर. पी. क्र. ७- आंबेडकर नगर असे एकुण १३४.२२ हेक्टर एवढ्या क्षेत्रफळाचे ७ नागरी पुनरुत्थान आराखडे प्राधान्याने राबविण्याचा निर्णय मा.सर्वसाधारण सभेने घेतला आहे. या सहा नागरी पुनरुत्थान आराखडयामध्ये सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर क्लस्टर योजनेतंर्गत पहिल्या टप्यातील ६ युआरपी च्या एकुण ९२ हेक्टर क्षेत्राचे एकात्मीक सर्वेक्षण, सामाजिक आर्थिक सर्वेक्षण आणि त्या क्षेत्राच्या माहिती प्रबोधन करणेकरिता रक्कम रु. १० कोटी खर्च अपेक्षित आहे.

शासन शुध्दीपत्रक क्र. मनपा-२०२३/प्र.क्र.२२१(३)/नवि-१६ दि. ०५ एप्रिल २०२३ नुसार शासनाने मुलभुत साई सुविधांचा विकास योजनेतंर्गत महापालिका क्षेत्रात क्लस्टर योजना करणेकरिता ९ कोटी ४० लक्ष अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे.

## महिला व बालकल्याण कार्यक्रमांतर्गत कल्याणकारी योजना:

**सन २०२३-२४ महिला व बालकल्याण विभागा मार्फत राबविण्यात येत असलेल्या/येणा-या योजनेचा तपशिल.**

- निराधार/एकल/घटस्फोटीत महिलांच्या मुलींना विवाहाकरीता अर्थ सहाय्य देणे बाबतची योजना राबविण्यात येत आहे.
- निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुला-मुलींना शिक्षणाकरीता शैक्षणिक मदत देण्यात येते.
- वय वर्षे ६० वर्षापर्यंतच्या ज्या महिलेच्या पतीस व विधवा महिलांच्या बाबतीत त्यांच्या वय वर्षे १ ते १८ वर्षापर्यंतच्या मुलांना (पुरुष) कॅन्सर आजाराने ग्रस्त असतील अशा महिलांना आर्थिक मदत देणेत येते.
- महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता ०७ वी व ०८ मधील मुलींना सॅनेटरी नॅपकीन/डेटॉल साबण पुरवठा करण्यात आलेला आहे.

- ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करणे.
- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गरीब व गरजु महिला व बचत गटा करिता स्वयंरोजगार करणे कामी साहित्य वाटप करण्यात येते.
- महिलांना विभागामार्फत विविध प्रशिक्षण देण्यात येते.
- गरोदर माता व प्रसुती करिता आलेल्या माता मनपा रुग्णालयात दाखल झाल्यास त्यांना मोफत सकस आहार पुरविण्यात येतो.
- इयत्ता १० मधील विदयार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येतो.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत स्तन (कॅन्सर) तपासणीसाठी (mammography) मशीन खरेदी करुन सदर मशीन इंदिरा गांधी हॉस्पीटलमध्ये कार्यान्वित केली आहे. त्यामुळे गरीब व गरजू महिलांची मोफत स्तन कॅन्सर तपासणी करण्यात येत आहे.
- दि.१९ नोव्हेंबर ते दि. २५ नोव्हेंबर कौमी एकता सप्ताह साजरा केला जातो
- लैगिंक तक्रार निवारण समितीगठीत करण्यात आलेली आहे
- महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते
- यासर्व बाबींसाठी सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पात सुध्दा महिला व बालकल्याण योजना या लेखाशीर्षांतर्गत रु.६ कोटी ६० लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

## दिव्यांग कल्याणकारी/ समाज कल्याण योजना :

- दिव्यांगा करीता मोफत फिजियोथेरेपी सेवा केंद्र
- दिव्यांगा करीता मोफत बस सेवा
- दिव्यांगा करीता मोफत पेॲण्ड पार्क सुविधा
- दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरि उपजीविका अभियान-७८%
- पीएम स्वनिधी अंतर्गत प्राप्त एकूण उद्दिष्टनुसार ११३ % अर्ज भरण्यात आलेले असून ८१% कर्ज प्रकरणे बँक मार्फत मंजूर करण्यात आलेली आहेत.
- महानगरपालिका शाळा करिता ५ क्रीड़ा शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

- राष्ट्रीय महामार्ग ८ येथे क्रिडा संकुल सुरू करण्यात आलेले आहे.
- राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या खेळाडू साठी क्रिडा संकुलामध्ये त्यांच्या खेळाच्या
- सरावाकरिता मोफत प्रवेश देण्यात आलेला आहे.
- जिल्हा स्तरीय शालेय क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे.
- आशा स्वयंसेविका यांना अतिरिक्त मानधन देण्यात येते
- जेष्ठ नागरिकांकरीता विरंगुळा केंद्रकार्यरत असुन त्यांच्या करीता महानगरपालिकेमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

यासर्व बाबींसाठी सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पात दिव्यांग कल्याणकारी/ समाज कल्याण योजना या लेखाशीर्षांतर्गत रु.१० कोटी ६५ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

## परिवहन सेवा:

मिरा- भाईंदर शहरासाठी परिवहन सेवा ही मुलभूत सेवा असून, सद्यस्थितीत परिवहन सेवेकडे ७४ डिझेलवर चालणाऱ्या व नव्याने ताफ्यात दाखल झालेल्या १५ इलेक्ट्रीक बसेस अशा एकूण ८९ बसेस प्रवर्तनासाठी उपलब्ध आहेत. बसेस चालविण्यासाठी महानगरपालिकेने **Gross Cost Contract (GCC)** तत्त्वावर दोन स्वतंत्र बस ऑपरेटर यांची नियुक्ती केलेली आहे.

मिरा -भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी मौजे घोडबंदर येथे अदयावत बस डेपो आहे. यामध्ये बस निगा/दुरुस्ती कार्यशाळा, कार्यशाळेसाठी आवश्यक **Depot Equipment,** अद्ययावत **ITS यंत्रणेसह Command & Control Center** उभारण्यात आलेले आहे. तसेच **Electronic Ticketing** सुविधां उपलब्ध करून देण्यात आलेली असुन **"MAJHI BUS""मोबाईल ॲप"** सुरू करण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेकडून "परिवहन उपक्रमास" अर्थसहाय्य मिळणे आवश्यक आहे. आगामी आर्थिक वर्षामध्ये उर्वरीत ४२ e-Buses परिवहन सेवेमध्ये दाखल करून परिवहन सेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशिल आहोत. तसेच क्रेंद्र शासनाचे PM-eBus Sewa प्रकल्पांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी १०० e-Bus मंजूर झालेल्या आहेत. या योजनेतंर्गत बसप्रवर्तनासाठी क्रेंद्र शासनाकडून पुढील १० वर्षे सहाय्यक अनुदान प्राप्त होणार असून सदर योजनेतंर्गत डेपोसाठीदेखील अनुदान अपेक्षित आहे. तसेच परिवहन सेवेसाठी ITMS यंत्रणा कार्यान्वीत असून

काळानुरूप ही यंत्रणा अद्यावत करणे आवश्यक आहे. त्याकरीता केंद्र शासनाचे रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडून ITMS यंत्रणा अधिक सक्षम, प्रवाशांच्या सोयीयुक्त करणेसाठी अनुदान प्राप्त होणार आहे.

❖ सन २०२३-२०२४ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. २८ कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

❖ सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ४५ कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

## उद्यान विभाग

- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये उद्याने-89, मैदाने-15 व दुभाजके-20 विकसीत करुन सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सदर ठिकाणची निगा व देखभाल विभागामार्फत करण्यात येते.
- महाराष्ट शासनाच्या माझी वसुंधरा अभियान 3.0 मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेला 03 लाखते 10 लाख लोकसंख्या गटामध्ये प्रथम क्रमांक रु 7:00 कोटी बक्षिस रक्कम व भूमीथीमटिक मध्ये उच्चतम काम केल्याबद्दल प्रथम क्रमांक रु. 2:00 कोटी रक्कम असे रु. 9:00 कोटी बक्षिस रक्कम प्राप्त झालेले आहे.
- मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे. उद्याने,मैदाने व दुभाजक यांची निगा देखभाल करणे.
- नव्याने उद्याने व हरित पट्टे विकसित करणे.
- उद्यानात लहान मुलांकरिता खेळणी बसवणे. नागरिकांकरिता खुल्या जागेतील व्यायामाचे साहित्य बसवणे.
- जे.पी. इन्फ्रा रोड, घोडबंदर, मिरारोड पूर्व येथे शोभिवंत झाडे लावुन हरित पट्टा विकसित केला आहे.
- आरक्षण क्र 226, भाईंदर पूर्व,इंद्रलोक पाण्याची टाकी बाजूच्या जागेत मियावाकी पध्दतीने वृक्षारोपण करण्यात आले आहे.
- झाडांच्या फांदया, पालापाचोळा व Garden waste यापासून वूड ब्रिक्स व कंपोस्ट खत तयार करण्याचा प्रकल्प तयार करण्यात आला आहे.
- सन २०२३-२०२४ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ५० कोटी १८ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.
- सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ५९ कोटी ५१ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

## वैद्यकीय आरोग्य विभाग

❖ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात २३२ खाजगी रुग्णालय व ११०९ खाजगी clinics आहेत. यामध्ये प्रामुख्याने ओकार्ड हॉस्पिटल, भक्ती वेदांत हॉस्पिटल, तुंगा हॉस्पिटलचा समावेश आहे. तसेच शासनाचे भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पिटल तसेच महानगरपालिकेचे ११ आरोग्य केंद्रे, १ फिरता दावाखाना व १ भारत रत्न पंडीत भिमसेन जोशीरुग्णालयांमार्फत सदर सुविधा पुरविल्या जातात. तसेच राष्ट्रीय शहरीआरोग्य अभियान (NUHM) महानगरपालिका क्षेत्रात राबवण्यात येत आहे.

| **विभागाची कामे (संक्षिप्त)** |
|---|
| • महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयाच्या माध्यमातुन आरोग्यसेवा पूरविल्या जातात. |
| • बालकांचे नियमित लसीकरण (सार्वजनिक लसीकरण कार्यक्रम) |
| • राष्ट्रीय पल्स पोलिओ निर्मूलन कार्यक्रम. |
| • सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (RNTCP) |
| • राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम |
| • राष्ट्रीय किटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम |
| • सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविणे |
| • हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत MASS DRUG ADMINISTRATION मोहिम राबविणे |
| • तांबी बसवणे, कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणे |
| • शासनाचे माता व बाल प्रजनन (आरसीएच) कार्यक्रम राबविणे. याअतंर्गत माता व बालसंगोपनविषयक सेवा पुरविल्या जातात. |

- राष्ट्रीय शहरीआरोग्य अभियान (NUHM) महानगरपालिका क्षेत्रात राबवण्यात येत आहे.
- महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ११ आरोग्य केंद्रे, १ फिरता दवाखाना व १ रुग्णालयांमार्फत सामाजिक व आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या जातात.
- रुग्णालयाच्या प्रसुति गृहांमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ तसेच बालरोग तज्ज्ञांमार्फत स्वाभाविक व गरज पडल्यास शस्त्रक्रियेद्वारे प्रसुति केल्या जातात.

❖ **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रामार्फत बाह्यरुग्णतपासणी तसेच खालील नमूद शासनाचे सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात**:-

- आरसीएच कार्यक्रम
- जननी सुरक्षा योजना
- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम
- कुटुंब नियोजन कार्यक्रम
- प्रधानमंत्री मातृ वंदना योजना
- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान
- सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम
- राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम
- एड्स नियंत्रण कार्यकम
- बालकांचे नियमित लसीकरण (सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम)
- राष्ट्रीय पल्स पोलिओ निर्मूलन कार्यक्रम.
- राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम

- राष्ट्रीय किटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम
- हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम, इ.

❖ राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, १५ व्या वित्त आयोगांतर्गत मिरा भाईंदर महानगरपलिकेकरिता ३५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र व ११ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना चालू करण्याकरिताचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी महानगरपालिकेच्या १० जागांवर नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र तयार करण्यात आली असून ५ जागांवर नागरी आरोग्य केंद्र तयार करण्याकरिताची कार्यवाही सुरु आहे. सबब एकूण १५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांकरिता आवश्यक मनुष्यबळ भरती करणेकरिताची प्रक्रिया चालू आहे.

❖ सन २०२३-२०२४ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ६५ कोटी ५८ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

❖ सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ८३ कोटी ४३ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

## शिक्षण विभाग

**दि**.२८/०२/२००२ रोजी **मिरा भाईंदर महानगरपालिका**स्थापन झाल्याने **दि**. २१/०४/२००६ रोजी **शासन राजपत्रात शिक्षण** मंडळ **अस्तित्वात आला**. सन २०१६ पासुन शिक्षण मंडळ बरखास्त होऊन महानगरपालिकेत विलिन झाल्या. **आजमितीस मनपाच्या** ३६ **शाळा** (**मराठी** -२१, **हिंदी** -५, **उर्दु** -५ **गुजराती** -५) **असुन त्यात** ८८६४**विदयार्थी शिक्षण घेतात व** १४८ **शिक्षक कार्**यरत **आहेत**. तसेच कंत्राटी पद्धतीवर ठोक मानधनावर एकूण ४८ शिक्षक व शारिरीक शिक्षणासाठी एकूण ०५ शिक्षक मनपा शाळांवर कार्यरत आहे.

एकुण बालवाडी – २६, बालवाडी शिक्षिका -२७, बालवाडी विद्यार्थ्यांची पटसंख्या -७४२,

मनपा शाळा – ३६, खाजगी अनुदानित शाळा -३८, विना अनुदानित -२७, मान्यता प्राप्त नसलेली शाळा -०१

शाळा दुरुस्ती करतांना मुलभूत सुविधा देण्यावर भर देण्यात येणार असून त्यामध्ये कोणत्याही शाळेत गळती असू नये व शौचालय उत्तम दर्जाचे असेल याबाबत दक्षता घेतली जाईल.

प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत विदयार्थ्यांच्या विविध योजनांसाठी एकूण रु.५५कोटी ५७ लक्ष, यामध्ये प्रामुख्याने शाळा मजबूती करण्यासाठी १२ कोटी २५ लक्ष व शाळा बांधकामासाठी रु.०५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## महापालिका क्षेत्रात CBSE शाळा सुरु करणे :

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत CBSE शाळा सुरु करणे नियोजित आहे. CBSE हे राष्ट्रीय स्तरावरील बोर्डअसून सद्या मिरा भाईंदर शहरात CBSE बोर्ड मधून शिक्षण घेण्यासाठी प्रामुख्याने फक्त खाजगी शाळांचा पर्याय उपलब्धआहे. CBSE अभ्यासक्रम मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोगी असून त्या माध्यमातून मुलांचा बौध्दिक विकास प्रभावीपणे होणे शक्य होते. मुलांच्या भविष्यातील प्रगतीचा विचार करता भविष्यवेधी शिक्षण देणे शक्य होईल. प्रत्येक पालकालामुलांना चांगले शिक्षण द्यावयाचे असते. मात्र सर्वसामान्य पालकांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना CBSE शाळेमध्ये प्रवेश घेणे शक्य होत नाही. CBSE अभ्यासक्रमाच्या शाळा महापालिकेने सुरु केल्यास महापालिका शाळा चालवत असल्याने मुलांना मोफत शिक्षणाचा लाभ होईल.

❖ सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. १ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

**एकुण – ३६६ मध्ये १ ली ते १२ वी विद्यार्थी संख्या १,३६,१६८**

**संगणक कक्ष व ग्रंथालय –**

- **CSR Fund अंतर्गत D'mart या संस्थेने ०५ महानगरपालिकेच्या शाळांना संगणक कक्ष व ग्रंथालय दिलेले आहेत.**

| क्र. | शाळेचे नाव |
|---|---|
| १ | मनपा शाळा क्र.०४ काशी उर्दु |
| २ | मनपा शाळा क्र. १० चेणे मराठी |
| ३ | मनपा शाळा क्र. १८ भाईंदर |
| ४ | मनपा शाळा क्र. १९ माशाचा पाडा |
| ५ | मनपा शाळा क्र. २२ मुर्धा |

## पर्यावरण विभाग

१५ व्या वित्त आयोगांतर्गत हवेची गुणवत्ता सुधारणेकामी “स्वच्छ हवा कृती आराखडा” (NCAP) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस एकूण रक्कम रु. ८१.२० कोटी निधी प्राप्त होणर असून सन २०२२-२३ पर्यंत एकूण रक्कम रु. ४२.७५ कोटी निधी प्राप्त झालेला आहे. “शहर हवा कृती आराखडा” (City Air Action Plan) नुसार वितरीत करण्यात आलेल्या निधीतून खालीलप्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

- पर्यावरण विभागामार्फत धूळ प्रदूषण नियंत्रणाकरिता ५ नग Mist Spray Machine व २ नग Mist Spray Machine (गाडीवर फिरती)कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी IEC इलेक्ट्रिक वाहन खरेदी करण्यात आलेले असून त्यामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध उपक्रमांची जनजागृती करण्यात येत आहेत. तसेच मिशन लाईफ (Mission LiFE) अंतर्गत बॅनर, होर्डिंग्स, सोशल मीडिया पोस्ट व विविध ठिकाणी अनेक पथनाट्य द्वारे नागरिकांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती करण्यात येत आहे.
- घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत ३ नग रस्ते सफाई मशीन (Mechanical Road Sweeping Machine) खरेदी करण्यात आलेल्या आहेत.
- उद्यान विभागामार्फत विविध ठिकाणी ग्रीन स्पेस तयार करणे तसेच Horticulture Compost Plant (झाडांच्या फांद्या / पालापाचोळा पासून खत निर्मिती)करिता प्लांट उभारण्यात आलेला आहे. तसेच पाण्याचे कारंजे (Water Fountain) उभारण्यात येत आहेत.
- बांधकाम व विद्युत विभागामार्फत विविध ठिकाणी सोलार प्लांट कार्यान्वित करणेत आलेले असून विविध स्मशानभुमींमध्ये स्क्रबर बसविण्यात आलेले आहेत. तसेच इलेक्ट्रिकल विद्युतदाहिनी (Electric Crematorium) तयार करण्यात येत आहे. तसेच EV चार्जिंग स्टेशन कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.
- परिवहन विभागामार्फत ५७ इलेक्ट्रीक बस खरेदी करणेतयेणार असून १३ इलेक्ट्रीक बसेस महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत.
- सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. २७ कोटी १३ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

## संगणक विभाग:

१) ई-गव्हर्नस अंतर्गत महानगरपालिकेच्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ (RTS) सेवा ऑनलाईन द्वारे देण्यात येणार आहेत. नागरिकांना सर्व सेवांसाठी शुल्क ऑनलाईनद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.

२) मनपा शाळेतील वर्ग डिजीटल करण्यात येणार आहेत. ERP सर्व विभागात कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

३) मनपाचे सर्व विभागातील संगणक आज्ञावलीचे Integration करण्यात येणार आहे.

४) मनपाच्या अभिलेख Scanning व Digitization करण्यात येणार आहे.

५) E-Office ची अंमलबजावणी

- ❖ केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या ई-गव्हर्नस धोरणानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये E-Office कार्यप्रणालीची माहे ऑक्टोंबर २०२३ पासून काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असून मिरा भाईंदर महानगरपालिका ही १००% E-Office कार्यप्रणाली कार्यान्वित करणारी महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका म्हणून मान मिळाला आहे
  - ❖ सन २०२३-२०२४ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. ११ कोटी ८० लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.
  - ❖ सन २०२४-२०२५ या वार्षीक अर्थसंकल्पात या लेखाशीर्षाखाली रु. १५ कोटी ४७ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

## आभार :

मिरा भाईंदर शहराला केंद्र शासनाने जे योगदान दिले त्याबद्दल केंद्र शासनाचे विशेष आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री यांनी मिरा भाईंदर शहराच्या विकासाला वेळोवेळी प्राधान्य देऊन निधी उपलब्धतेबरोबरच इतर अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी वैयक्तिक पुढाकार घेऊन मोलाची भुमिका बजावली आहे. त्याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय यांचे विशेष आभार व्यक्त करीत आहे.

ठाणे जिल्हयाचे मा.पालकमंत्री, मा.राज्यमंत्री - केंद्र सरकार, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार तसेच मा.मुख्य सचिव, मा.आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नगर विकास विभागाचे मा.अप्पर मुख्य सचिव, मा.प्रधान सचिव , पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव ,मा.अध्यक्ष स्मार्ट सिटी लिमिटेड व शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सर्व माजी सन्माननीय पदाधिकारी व सन्माननीय माजी लोकप्रतिनिधी यांची महापालिकेच्या सुनियोजित विकासासाठी भुमिका नेहमीच सकारात्मक राहिली आहे, त्यांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

मिरा भाईंदरशहरातील सर्व वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांचे पत्रकार,प्रतिनिधी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे आभार व्यक्त करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र !

संजय श्रीपतराव काटकर,(भाप्रसे)
**मिरा-भाईंदर महानगरपालिका, आयुक्त**